Vol 2 Issue 6 March 2013

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

## Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

***Advisory Board***

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Review Of Research
Vol.2, Issue.6, March. 2013
ISSN:-2249-894X
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# संत श्री तुकाविप्रांचा सार्थ हरिपाठ

भारती रेवडकर,

मराठी विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर विभाग, पीएच.डी.संशोधन केंद्र, श्री.शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

**सारांश :**

संत श्रीज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव इ. संतांच्या परंपरेतूनच पुढे संत तुकाविप्रांनी हरिपाठाच्या अभंगाची रचना केली. कारण या सर्व संतांच्या वाङमय निर्मितीच्या ज्या प्रेरणा होत्या त्याच प्रेरणेतून संत तुकाविप्रांनी आपली वाङमयनिर्मिती केली. या सर्व संतांच्या वाङमयाचे संस्कार तुकाविप्रांवर असल्यामुळे या संस्कारातूनच तुकाविप्रांनीही हरिपाठाचे लेखन केले.

## प्रस्तावना :

संतवाङमयात नामभक्ती, नामसंकीर्तनालाच महत्व असल्यामुळे नाममहिमा, नामस्मरण याचेच उत्कट आविष्करण संतकाव्यातून झालेले असतेसंतांना आलेली विशिष्ट अनुभूती व या अनुभूतीचे उत्कटपूर्णरितीने झालेले आविष्करण यामुळे संतकाव्याला विशेष महत्व आहे. श्री विठ्ठल महिमा, नामस्मरण व नामसंकीर्तन यावरच संतकाव्याचा महत्वाचा भर असल्याने संतांनी आपल्या साध्या, सोप्या भाषेत सामान्यजनांसाठी निरुपण केले आहेसंत तुकाविप्रांनीही आपल्या साध्या, सोप्या, रसाळ वाणीने हरिपाठाचे हे अभंग सामान्यजनांसाठी सांगीतले. यामध्ये कोठेही अवजड, गूढ म्हणजेच रहस्यमय वाटणा—या शब्दांचा वापर नाही. श्री विठ्ठलाचा साक्षात्कार हवा असेल तर, सदगुरुकडून मिळालेला नाममंत्र व या नाममंत्राव्दारे जी शक्ती मिळते त्यामुळे अनुभूती निर्माण होते. नामस्मरणाने भाव—भक्ती व प्रेम संवर्धन होऊन साक्षात्कारापर्यंत पोचून साधकाला विठ्ठल स्वरुपच झाल्याची अनुभूती येते. भक्तीभावाने, उत्कट अंतःकरणाने, प्रेमपूर्वक भावाने विठ्ठलस्वरुपी लीन झाले तर परमेश्वर साक्षात्काराचा अनुभव येतो असे तुकाविप्र या हरिपाठांतून सांगतात.

संत तुकाविप्रांच्या हरिपाठांतील अभंग पाहिले तर त्यातून अध्यात्मिक, भक्तीपर दृष्टीकोनाचा जागोजागी प्रत्यय येतो

संत तुकाविप्र विठ्ठलाला नम्रभावाने, प्रेमभावाने नमन करुन विठ्ठलनामाची महती गातात. स्वतःचे मन कुठल्याही बंधपाशात अडकू नये असे त्यांना वाटतेमाझे मन नेहमी विठ्ठलाच्या भोवतीच असावे. तुकाविप्र अगदी भक्तिभावाने आपले मनच विठ्ठलाला अर्पण करतात. संतसंगाचे महत्वही त्यांना पटतेसत्य ाबददल प्रेम वाटूनच नामस्मरणाचा जयघोष करावा, असे त्यांना वाटते म्हणूनच ते म्हणतात,—

देवा विठ्ठला हे प्रिती। तुज नमन विनंती।
नित्य नेम नामावळी। हरी विठ्ठल धुमाळी।
ऐसा गजर आभंग। सर्वकाळ संत संग।
तुकाविप्र म्हणे नेम। सर्व अंगी सत्यप्रेम।

पुढे तुकाविप्र म्हणतात—

सांगितली ऐसी वाट। नामकथा हे वैकुंठ।
जनी वनी कोठे वसा। हरी नाम लावा धोसा।
विप्र आज्ञा ऐसी आहे। न सोडावी भक्ती सोय ।

Title: संत श्री तुकाविप्रांचा सार्थ हरिपाठ
Source:Review of Research [2249-894X] भारती रेवडकर, yr:2013 vol:2 iss:6

तुका चाले तया पंथे। विप्र आज्ञेच्या सामर्थे।

तुकाविप्र गुरुआज्ञेच्या सामर्थ्यावर चालत आहेत. ''नामकथा हेच वैकुंठ आहे'', असे गुरु सांगतात. म्हणून कुठेही असले तरी सतत हरिनामाचाच ध्यास घेतला पाहिजे. लोकांत असा एकांतात असा ''हरिनामा''चा गजर, जयघोष करायला हवा. सतत मनात हरिनामाचाच ध्यास असायला हवा. गुरुंची आज्ञाच अशी आहे की भक्तीमार्ग सोडू नये. भक्तीमार्गासाठी सतत हरिचे नामस्मरण करावे. भक्तीमार्गाने परमेश्वरप्राप्तीचा मार्ग सुलभ होतो. यालाच पुढे जोडून तुकाविप्र गुरुच्या आज्ञेचा महिमाही वर्णन करतात. संतांच्या सहवासात राहूनच भक्तीचा उमाळा मनात सतत ठेवला पाहिजे. यासाठी तुकाविप्र म्हणतात–

विप्र आज्ञेचा प्रसाद। नाम किर्तनी प्रसिध्द।
ब्रम्हानंद सर्वकाळ। ही कीर्तन कल्लोळ।
नित्य संत समागम। भक्ती सर्वांगासी प्रेम।
तुकाविप्र सत्ता ऐसी। नाम गावे दिवानिशी।

संत तुकाविप्रांनी गुरुचा महिमा इतर संतांच्या संस्काराने वर्णिला आहेसंतपरंपरेतील संतांनी गुरुमहिमा, गुरुमाहात्म्य याला जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. गुरुशिवाय सद्‌गती नाही असे प्रत्येक संताने पटवून दिले आहे. संत तुकाविप्र पुढील अभंगात म्हणतात,

सेवा सद्‌गुरुची सार। नामकथा निरंतर।
भाग्यवंता घडे ऐसे। येरा नर्म कळे कैसे।
गुरुकृपा जयावरी। मुखी नाम त्याचे हरी।
नामधार धन्ये एक। सर्व तयापाशी सुख।

हरिनामाचा गजर करावा, जयघोष करावा हा तर आमचा नित्य नियम आहे. सतत भक्तीपूर्ण मनाने संतांच्या सहवासातच रहावे, त्यातच आनंद मानावा असे तुकाविप्र म्हणतात. गुरुआज्ञा आपण सर्वस्व मानून त्याप्रमाणे आचरण करुन सतत, अखंडपणे नामस्मरण केले पाहिजे

नित्य आमुचा हा नेम। हरी नाम गजवि।
संत चरणी लोळावे। भक्ती भावे सर्वदा।
संत बसावे संगती। क्षमा दया युक्त शांती।
गुरु आज्ञेचे हे धडे। सत्य चालती उघडे।
तुकाविप्र म्हणे गडे। नित्य नाम हे रोकडे।

पुढे तुकाविप्र म्हणतात जो अखंडपणे नामस्मरण करतो, सतत हरिनामाचा गजर करतो त्यालाच पंढरीचा राया विठ्ठल वैकुंठास येण्याविषयी बोलावत असतो. म्हणून भक्तांनी सदा सर्वकाळ भक्तीपूर्ण अंतःकरणाने परमेश्वराचे नामस्मरण करायला हवे. याविषयीचा हरिपाठातील पुढील अभंग लक्षात येतो–

नाम गाती तया देव पालवतो।
चला रे म्हणतो वैकुंठासी।
वाटा देईन मी आपुल्या सुखाचा।
राणा पंढरीचा, वदे ऐसा।
तुकाविप्र म्हणे भावभक्ती युक्त।
नाम गावे सत्य सर्वकाळ।

सतत नामस्मरणाने भक्तांना लाभ होईल हे तुकाविप्र स्वानुभवाने सांगतात–

नाम गर्जना ''हरि'' करा। कोटी कुळे सत्य उध्दरा।
विनंती ऐसी भाविका खरी। नाम किर्तनी घ्या श्रीहरी।
सर्व साधनी शीण वाउगा। शेवटी दिसे व्यर्थ तो दगा।
म्हणुनी आता किर्तनी बसा। प्रगटची सभे संत दिसा।
विप्र आवडी किर्तनी तुका। लाभ हा कळी सेवटी निका।

तुकाविप्र नामस्मरणाचे महत्व काही उदाहरणांनी पटवून देतातनामस्मरणात दंग राहिले तर भक्त भवसागरातून तरुन जातो. अखंड नामस्मरणाने त्याच्यात एक आगळेच तेज, सामर्थ्य प्रकटते. या सामर्थ्याव्दारेच तो भवसागर पार करु शकतो. नाम हे देवाहून श्रेष्ठ आहे हे वेदांनी, पुराणानेच प्रमाणित केले आहे. रामनामाने समुद्रात शीला तरल्या. त्या नामशीलाचा तंतु झाला आणि महासागर पार करता आला. परंतु रामाने स्वहस्ते जी शीला समुद्रात टाकली ती बुडाली. तेव्हा नामकथा प्रमाण सिध्द झाली. प्रगाढ ब्रम्हज्ञानी विद्‌वान जर आसक्तीपूर्ण जगत असेल तर त्याचे ब्रम्हज्ञान, त्याची विदवत्ता काहीच उपयोगाची नाही. विद्‌वत्तेचा योग्य वापर करायचा असेल तर त्याबरोबरच नामसंकीर्तनाचीही गरज आहे. या आशयाचा संत तुकाविप्रांचा पुढील अभंग विचारात घेणे आवश्यक आहे.–

ब्रम्ह ज्ञान सांगताती। आशापाशी गुंतलेली।
काय तया ब्रम्हज्ञान। भले नाम संकीर्तन।
तारु सर्वत्रासी नाम। हरि विठ्ठल उत्तम।
ब्रम्हा ज्ञानी धन लोभी। तुर्त फजीती हे उभी।
तुकाविप्र निर्लोभता। नित्य नेम नामकथा।

संत तुकाविप्र प्राकृत जनांना म्हणतात, उगाचच गुजगोष्टी सांगण्यात जीवन व्यर्थ घालवू नको. फालतु गप्पागोष्टी करण्यात काहीच अर्थ नाहीगप्पागोष्टी करण्यापेक्षा विठ्ठलाचे नामस्मरण करा. विठ्ठलभक्ती, विठ्ठलस्मरणी प्रीती करा. उगाचच वाचा शक्तीचा अपव्यय करु नका. वाचा शक्ती वाया घालवू नका. उगाचच जास्त बोलून जीवाला व्यर्थ शिणवू नका. त्यापेक्षा एक क्षण तरी शुध्द भक्तीपूर्ण अंतःकरणाने हरिचे नामस्मरण करा. हे वेदांनी, शास्त्रांनी व संतांनी प्रमाणित केलेलेच आहे. श्रीहरीचे स्मरण करणेच वेदांनी प्रमाणित केले आहे म्हणून संत तुकाविप्र म्हणतात हे सर्व आवडीने करावे नामसंकीर्तन करणे म्हणजेच जीवनाचा योग्य उपयोग करणे होय.

*निष्कर्षः–*

हरिच्या नामाचा गजर, जयघोष करणे म्हणजे पोरासोरींचा खेळ नव्हे ''हरि'' या शब्दांभोवती स्वयंसिध्द मंत्र आहे हे शब्द फक्त उच्चारायचे नाही तर अगदी मनात, अंतःकरणातून या शब्दांचे मूळ स्फुरले पाहिजे.अंतःप्रेरणेतून हा शब्द, हरिनामाचा गजर झाला पाहिजे. ओकांराचा उगमही हरि मंत्रापासून झाला आहे. ओंकाराचे मुळ हरिमंत्र आहे. नामस्मरण, नामसंकीर्तन हेच स्वयंभू आहे. हरिहरि विठ्ठल विठ्ठल हे कीर्तन करायचे कारण हेच, सर्व साधनाचे सार आहे. हरिनामाविना ओंकार थोटा आहे. निष्प्रभ आहे. म्हणूनच तुकाविप्र उपदेश करतात, ''हरि नाम गर्जा किर्ती त्रिभुवनात करा ''

संत तुकाविप्र स्वतः अखंड नामस्मरण करुन भक्तांना, प्राकृत जनांना, भोळया भाबडया जनांनाही सुलभ भक्तीमार्ग सांगतात. त्यांना भक्तीच्या मार्गावर नेण्यासाठी साधा, सोपा नामस्मरणाचा उपाय सांगतात

*संदर्भ ग्रंथः–*

1. शेणोलीकर, ह.श्री., प्राचीन मराठी वाङःमयाचे स्वरुप, प्रसाद प्रकाशन, पुणे.
2. बोरगावकर रविंद्र, प्राचीन मराठी चरित्र वाङःमय.
3.तुकाविप्रांची प्रकाशित कविता.
4. तुकाविप्रांची अप्रकाशित कविता

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net